# फेस्टिव्हलऐवजी 'महोत्सव'

**म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांच्यातर्फे भरविल्या जाणाऱ्या नाशिक फेस्टिव्हलला पूर्णविराम मिळाल्याने राज्य सरकारबरोबरच नाशिकमधील विविध संघटनांच्या माध्यमातून नाशिक महोत्सव भरविण्यात येणार असल्याची घोषणा पर्यटनमंत्री जयकुमार रावल यांनी केली. त्यामुळे पर्यटनाच्या नथीतून भाजपने भुजबळांवर आणखी एक निशाणा साधला आहे. याच महोत्सवात वाइन फेस्टिव्हलचेही आयोजन केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.



ट्रॅव्हल एजंटस असोसिएशन ऑफ नाशिक (तान) च्यावतीने गंगापूररोडवरील इंद्रप्रस्थ हॉलमध्ये तीन दिवसीय ट्रॅव्हल एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. नाशिकमध्ये पर्यटनाला मोठा वाव आहे. दोन दिवसांपूर्वीच झालेल्या बैठकीत आम्ही विविध निर्णय घेतले आहेत. त्यानुसार राज्यात सर्वाधिक पर्यटन निधी नाशिकला देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. आगरटाकळी येथील रामदासस्वामी मठाचा कायापालट करण्याचे त्यात निश्चित आहे. दरवर्षी नाशिकमध्ये ५ ते १० दिवसांचा नाशिक महोत्सव भरविण्यात येणार आहे. यात वाइन फेस्टिव्हल, ट्रॅव्हल एक्स्पो, सांस्कृतिक कार्यक्रम, वाइन पर्यटन अशा विविध बाबींचा त्यात समावेश राहणार आहे. राज्याच्या पर्यटन विभागाबरोबरच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि नाशिकमधील विविध संस्था-संघटनांच्या माध्यमातून भव्य स्वरुपाचा हा महोत्सव राज्याच्या पर्यटनाला चालना देणारा होऊ शकेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. गेल्या काही वर्षांपासून नाशिकमध्ये वाइन फेस्टिव्हल आयोजित केला जातो. यंदापासून हा फेस्टिव्हल सरकारच आयोजित करणार असल्याचे वृत्त 'मटा'ने दिले. त्यानुसारच नाशिक महोत्सवात वाइन फेस्टिव्हलचे आयोजन होणार असल्याचे पर्यटनमंत्र्यांनी सांगितले. याप्रसंगी व्यासपीठावर आमदार देवयानी फरांदे, बाळासाहेब सानप, तानचे अध्यक्ष दत्ता भालेराव, भाजपचे लक्ष्मण सावजी, पर्यटन व्यावसायिक ब्रिजमोहन चौधरी उपस्थित होते.



आता सरकारी वाइन फेस्टिव्हल

**पर्यटनमंत्री रावल यांची घोषणा**

## वाइन पर्यटनाला चालना

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रयत्नातून मुंबईमध्ये सीक्रूझ सुरू झाल्या आहेत. याद्वारे तब्बल तीन हजार पर्यटक मुंबईला येतात. याच पर्यटकांनी वाइन पर्यटन करावे, यासाठी आम्ही आग्रही आहोत. दोन दिवस हे पर्यटक नाशिकला येतील, अशा दृष्टीने आम्ही नियोजन करीत असल्याचे रावल यांनी सांगितले.

गंगापूर धरणाच्या ठिकाणी साकारण्यात आलेला बोट क्लब नक्की कधी कार्यान्वित होणार याबाबत अनिश्चितताच आहे. बोट क्लबला असलेला विरोध आणि विविध परवानगी यामुळे विलंब होत असल्याचे पर्यटनमंत्र्यांनी सांगितले. मात्र, हा बोट क्लब नक्की कधी सुरू होईल, याबाबत त्यांनी कुठलेही भाष्य केले नाही. ज्या बोटींची परवानगी मिळेल त्या लवकरात लवकर सुरू करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

### इगतपुरीत वेलनेस टुरिझम

लोणावळ्याकडे पर्यटकांचा मोठा ओढा आहे. पण, इगतपुरी तालुका अतिशय निसर्गसमृद्ध आहे. त्यामुळे इगतपुरीला प्रति लोणावळा बनविले जाणार आहे. वेलनेस टुरिझमला याठिकाणी चालना देण्यासाठी आम्ही नियोजन करीत असल्याचे रावल यांनी सांगितले.